# हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड
# प्रेसनोट ता. २०/०८/२०२२

## पीजी मधील रूमच्या दरवाज्याची कडी कोयंडा तोडुन आत मध्ये झोपलेल्या तरूणीच्या हातातील सोन्याची अंगठी व मोबाईल जबरदस्तीने हिसकाऊन जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक - हिंजवडी पोलीस तपास पथकाची कामगीरी

दि. १४/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे कु. मेघना रामचंद्र सावंत, वय २३, रा. एसएस पीजी, लक्ष्मी चौक, मारूंजी, पुणे या त्यांचे पीजीचे रूमची आतील कडी लाऊन झोपल्या असताना पहाटे ३:३० वा. चे सुमारास एका अनोळखी इसमाने त्यांचे रूमचे दरवाजाचे बाजुला असलेल्या खिडकीतून हात घालुन दरवाजाची आतुन लावलेली कडी उघडुन आत प्रवेश करून तरूणीच्या हातातील सोन्याची अंगठी व दोन मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकाऊन चोरून नेल्या बाबत गुन्हा दाखल आहे.

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे पिं चिं यांचे मार्गदर्शनाखाली सदर गुन्ह्याचा तात्काळ तपास चालु करून तपासादरम्यान घटनास्थळावर मिळून आलेले सीसीटीव्ही फुटेज तसेच आजुबाजुचे उपलब्ध एकूण ७२ सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून आरोपीचा येण्याजाण्याचा मार्ग काढुन संशयित इसम हा पांढऱ्या रंगाचे स्विफ्ट डिझायर गाडीतून घटनास्थळी आला व गेल्याचे निष्पन्न झाल्यावर, रात्रीचा अंधार व पाऊस यामुळे वाहनाचा नंबर दिसत नसतानाही. केवळ सदर वाहन ज्या ठिकाणाहून आले व परत तेथेच गेले त्या ठिकाणी सुमारे ३५० रूम भाडे तत्वावर असून, त्यातील राहणारे काही इसम हे त्यांचेकडील वाहन हे ओला उबरसाठी वापरत असल्याचे निष्पन्न झाले. त्या सर्वांकडे कसोशीने व कौशल्याने तपास करता, त्यामधील एका इसमाने संशयित इसमाचे प्राप्त फुटेजवरून त्यास ओळखले व त्याचेकडून प्राप्त झालेल्या मोबाईल नंबरवरून संशयित इसमाचे सीडीआरचे तांत्रीक विश्लेषण करून संशयित इसम हा सातारा येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून तात्काळ दोन तपास पथके तयार करून त्यांना तपासाच्या सुचना देऊन सातारा या ठिकाणी पाठविण्यात आले.

तपास पथके सातारा येथे पोहोचल्यावर त्यांनी तेथे तपास करून तेथुन आरोपी नामे **ओंकार शिवाजी खरात, वय २१, रा. बोडके वाडी, माण हिंजवडी पुणे व मुळ गाव सातारा** यास ताब्यात घेऊन त्यास पोलीस ठाण्यास आणून त्याचेकडे सखोल तपास करता तो सराईत गुन्हेगार असून त्याचेवर ...

**१) सातारा शहर पोलीस ठाणे, गुरनं १५३/२०२२, भादवि कलम ३९५,३४१,१२०(ब)**
**२) विटा पोलीस ठाणे गुरनं ६३/२०२०, भादवि कलम ३७९,३४**

असे गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. **त्याचेकडून हिंजवडी पोलीस ठाण्याकडील दाखल गुन्ह्यातीत जबरदस्तीने चोरलेली एक सोन्याची अंगठी, दोन मोबाईल फोन असा ५०,०००/- रू किंमतीचा माल हस्तगत करण्यात आला असून त्याने गुन्ह्याचे कामी वापरलेली एक स्विफ्ट डिझायर कार ही जप्त करून हिंजवडी तपास पथकातील पोलीसांनी उल्लेखनीय कामगीरी केली आहे.**

सदरची कारवाई मा.अंकुश शिंदे साो,पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. डॉ संजय शिंदे साो, अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. आनंद भोईटे, पोलीस उप आयुक्त परि. २, पिंपरी चिंचवड मा.श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त, वाकड विभाग वाकड, यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, डॉ.विवेक मुगळीकर, सुनिल दहिफळे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे), तपास पथकाचे प्रमुख सपोनि, सागर काटे, संदिप देशमुख, पोउनि, रमेश पवार, पोलीस अंमलदार बंडु मारणे, बाळकृष्ण शिंदे, बापुसाहेब धुमाळ, योगेश शिंदे, संजीव सावंत, कैलास केंगले, विक्रम कुदळ, अरूण नरळे, चंद्रकांत गडदे, रितेश कोळी, श्रीकांत चव्हाण, कारभारी पालवे, अमर राणे, ओमप्रकाश कांबळे, दत्ता शिंदे, सुभाष गुरव, सागर पंडीत यांनी केली आहे.

**(आनंद भोईटे)**
**पोलीस उप-आयुक्त परि-२,**
**पोलीस आयुक्तालय,पिंपरी चिंचवड,**